वाच

431, 52

म. ग्रं. सं. ठाणें, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग
दा. क्र. १०५३ दिनांक २८।२।८५
विषय बा.वा. क्र.........

रोज मुलांना एक गोष्ट सांगा.
३६० गोष्टी आणि १२ पुस्तकांचा संच.

# चैत्र

पंढरीनाथ रेगे

BVBK-0401753



अतुल बुक एजन्सी
प्रकाशन

३१७, नारायण पेठ, पुणे ३०

प्रकाशक
ना. गो. जोशी
अतुल बुक एजन्सी
प्रकाशन
३१७, नारायण पेठ
दैनिक प्रभातसमोर, पुणे ३०.
फोन नं. ४४९५४१

© सर्व हक्क सुरक्षित

पहिली आवृत्ती :
२३ जानेवारी १९८५

मुद्रक :
प्रमोद वि. बापट
स्मिता प्रिंटर्स
१०१९, सदाशिव पेठ
नागनाथ पाराजवळ
पुणे ४११ ०३०.

वाचनालय बा.वा.
१७५३
२८।२।८५

## राष्ट्रगीत

जनगणमन अधिनायक जय हे
भारत भाग्यविधाता ॥
पंजाब सिंधु गुजरात मराठा
द्राविड उत्कल वंग ।
विंध्य हिमाचल यमुना गंगा
उच्छल जलधितरंग ।
तव शुभ नामे जागें
तव शुभ आशिष मागे
गाए तव जयगाथा
जनगणमंगलदायक जय हे
भारत भाग्यविधाता ॥
जय हे, जय हे, जय हे, जय जय जय जय हे

मुलांचे मनोरंजन आणि बौद्धिक वाढ होण्यासाठी या कथा लिहिल्या आहेत.
या कामी भारतीय सांस्कृतिक कोष आणि इतर पौराणिक कथा
यांचे अनेक वेळा सहाय्य लाभले. या सर्वांचा मी ऋणी
आहे. त्याबद्दल त्यांचे मी मन:पूर्वक आभार मानतो.

---

## अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १) | पाडव्याची गोष्ट | ५ |
| २) | तिलकव्रताची कथा | ७ |
| ३) | मत्स्यकथा | ८ |
| ४) | चैत्रगौरीची गोष्ट | १० |
| ५) | गर्वहरण | ११ |
| ६) | अशोकवृक्षाची कथा | १३ |
| ७) | देवी चंदला परमेश्वरी | १३ |
| ८) | विरुपाक्षाची कथा | १४ |
| ९) | महाकालीची कथा | १५ |
| १०) | शिखर शिंगणापूर | १६ |
| ११) | मोराच्या पायांची कथा | १७ |
| १२) | रामाची गोष्ट | १८ |
| १३) | रामदासांची गोष्ट | १९ |
| १४) | बुधाष्टमीची कथा | २० |
| १५) | गोला गोकर्णनाथाची कथा | २१ |
| १६) | गोंडांची कथा | २१ |
| १७) | महावीराची कथा | २२ |
| १८) | हनुमानाची कथा | २४ |
| १९) | चंद्रपूरची महाकाली | २६ |
| २०) | लोकदेव जोतिबा | २७ |
| २१) | चित्रपौर्णिमा | २८ |
| २२) | डॉ. भीमराव आंबेडकर | २९ |
| २३) | वसंतऋतू | ३१ |
| २४) | घंटाकर्णाची कथा | ३२ |
| २५) | ढिंपुरी तीर्थाची कथा | ३३ |
| २६) | जनकपूर | ३४ |
| २७) | कामधेनूची गोष्ट | ३४ |
| २८) | पराक्रमी गरुड | ३६ |
| २९) | वज्रेश्वरीची गोष्ट | ३८ |
| ३०) | चैत्राचा महिमा | ३९ |
| ३१) | अभिलाषेचे फळ | ४० |
| ३२) | अंगठा पर्वताची कहानी | ४१ |
| ३३) | चित्रांग | ४७ |

म. ग्रं. सं. ठाणें, वाचनालय शाखा.
बाल कुमार विभाग
दा. क्र. १०५३ दि. २८।२।८५
विषय बा. वा. क्र. ........

## १ पाडव्याची गोष्ट



नवीन वर्षाचा प्रारंभ चैत्र शुद्ध प्रतिपदेस होतो; म्हणून ही तिथी 'वर्षप्रतिपदा' म्हणूनसुद्धा ओळखली जाते. आपल्याकडे रूढ असलेल्या शालिवाहन शकाचं नवीन वर्ष या तिथीला सुरू होतं: भारतातल्या इतर बहुतेक प्रदेशांतही याच तिथीला नवीन वर्षाचा प्रारंभ होतो. यासच गुढीपाडवा म्हणतात.

या दिवशी जुन्या प्रथेनुसार काही धार्मिक विधीही करतात. ब्रह्मदेवानं या तिथीला सूर्योदयाच्या वेळी जग निर्माण केलं. तशीच कालगणना सुरू केली. म्हणून या दिवशी ब्रह्मपूजा करण्याचा जुना प्रघात आहे. भविष्यपुराणात म्हटल्याप्रमाणे या तिथीला येणाऱ्या वाराच्या अधिपतीची पूजाही करण्याची प्रथा पडली आहे.

जुन्या प्रथेला अनुसरून वागणारे लोक या दिवशी अंगाला तेल लावून गरम पाण्यानं अभ्यंगस्नान करतात. मग कडुनिंबाची पानं चावून खातात. बांबूच्या काठीच्या टोकाशी रेशमी वस्त्र, कडुनिंबाच्या डहाळ्या, साखरेची गाठी व फुलांची माळ बांधतात; आणि टोकावर चांदीचं वा पितळीचं फुलपात्र वा गडू पालथा ठेवतात. मग अशी सजवलेली ही गुढी घराच्या दाराशी उंच किंवा गच्चीवर उभारून आनंद साजरा करतात. सूर्य मावळण्यापूर्वी गुढी उतरवतात. या प्रथेमुळं या तिथीला ' गुढीपाडवा ' म्हटलं जाऊ लागलं. त्या दिवशी उपाध्या-कडून पंचांगातील वर्षफल वाचून घेतात व गोडधोडाचं जेवण करतात.

वर्षातले साडेतीन शुभमुहूर्त मानलेले आहेत; त्यांतला गुढी-पाडवा हा एक होय.

ज्या शालिवाहन शकाचं नूतन वर्ष या दिवसापासून सुरू होतं, तो पैठणच्या सातवाहन राजघराण्यातील राजा होता. त्याच्याबद्दलची एक आख्यायिका अशी आहे–

एका ब्राह्मणाला दोन मुलगे व एक मुलगी होती. आईबाप वारल्यावर हे तिघेजण घराबाहेर पडले. गावोगाव फिरत ते पैठण नगरीत आले. तिथं एका कुंभाराच्या घरी त्यांना आसरा मिळाला. एके दिवशी ती मुलगी गोदावरी नदीवर एकटीच गेली. तर तिला पाहून शेष मोहित झाला. त्याचं आकर्षण वाटून तीही त्याला वश झाली. त्यांचा गांधर्वविवाह झाला. नंतर शेषापासून तिला एक मुलगा झाला. तो अर्थातच कुंभाराच्या संगतीत मातीची खेळणी बनवू लागला. त्या कलेत प्रवीण झाला. आपल्या सवंगड्यांना तो मातीच्या भातगाड्या बनवून द्यायचा. म्हणून त्याचं नाव पडलं शालिवाहन.

पैठणला त्यावेळी सोमकांत नावाचा राजा होता. तर उज्ज-यिनीला होता विक्रमादित्य राजा. पैठणमध्ये वाढत असलेल्या एका मुलाकडून आपला नाश होणार आहे, असं वेताळाकडून विक्रमादित्याला कळलं. म्हणून त्यानं अचानक पैठणवर स्वारी केली. या आकस्मिक हल्ल्यानं सोमकांत राजा पराभूत झाला. त्याला कैद करण्यात आलं.

घरी मातीचे हत्ती, घोडे, सैनिक यांच्याशी खेळत बसला अस-

ताना शालिवाहनाला आपल्या राजाचा पराभव झाल्याचं कळलं. तेव्हा त्याच्या मनात एक कल्पना आली. त्याप्रमाणं शेषराजाचं स्मरण करून त्यानं समोरच्या खेळण्यांत प्राण फुंकल्याचा आविर्भाव केला आणि नवल असं घडलं की त्याच्या कल्पनेप्रमाणं त्या मातीच्या खेळण्यांतून सहस्रावधी घोडेस्वार व सैनिक उत्पन्न झाले. ते सैन्य घेऊन शालिवाहनानं राजा विक्रमादित्याच्या सैन्याची दाणादाण उडवली. पराभूत झालेलं ते सैन्य नर्मदा नदीच्या पलीकडं पसार झालं. पैठणचा सोमकांत राजा कैदेतून सुटला. पुढं तो राजा मरण पावताच त्याच्या जागी लोकांनी शालिवाहनाला राजा म्हणून निवडलं.

---


## २ तिलकव्रताची कथा

चैत्र शुद्ध प्रतिपदेला तिलकव्रत करतात. या व्रतासाठी सुगंधी द्रव्यानं विष्णूची आकृती काढून ती पूजतात. वस्त्र व फळं-मुळं अर्पण करतात. व्रत करणारा ‘ आगामी वर्ष सुखाचं जावो व आपत्ती टळोत! ’ अशी प्रार्थना करणारा मंत्र म्हणतो. मग चंदनाचा तिलक कपाळाला लावतो.

स्त्री व पुरुष– दोघांनाही हे व्रत करता येतं. या व्रताची कथा ‘ व्रतराज ’ ग्रंथात दिली आहे ती अशी–

शत्रुंजय राजाला चित्रलेखा म्हणून पत्नी होती. तिनं तिलकव्रत घेतलं होतं. त्यामुळं शत्रुंजयाच्या जिवावर उठणारा शत्रू चित्रलेखेच्या कपाळावरील तिलकाच्या प्रभावामुळं त्याचा मित्र बनून जाई. एकदा हत्तीनं पाडल्यामुळं राजा मरणाच्या पंथाला लागला. त्याचे प्राण घेऊन जाण्यासाठी यमदूत येऊन दाखल झाले. पण नवल असं घडलं, की राजाच्या शेजारी बसलेल्या चित्रलेखेच्या कपाळावरचा तिलक पाहताच ते घाबरून माघारी गेले. पुढं राजा त्या दुखण्यातून बरा झाला आणि चित्रलेखेसह त्यानं बरीच वर्षं सुखासमाधानानं घालवली.

## ३ मत्स्यकथा



भगवान विष्णूनं चैत्र शुद्ध प्रतिपदेला दोन प्रहरी मत्स्यावतार घेतला, अशी समजूत असून त्या निमित्तानं मत्स्यजयन्ती हा उत्सव साजरा केला जातो.

विष्णूनं पृथ्वीवर एकूण दहा अवतार घेतल्याचं मानलं जातं. त्यांपैकी मत्स्य अवतार हा पहिला. 'शतपथ ब्राह्मण' या प्राचीन ग्रंथात या अवताराबद्दलची कथा पुढीलप्रमाणे दिलेली आहे–

एकदा मनू नदीवर अर्घ्य देत होता. तर त्याच्या हातांच्या ओंजळीतल्या पाण्यात आली एक इटुकली मासोळी. तो मनूला म्हणाला, "तू माझं पालनपोषण कर. म्हणजे काही वर्षांनी होणाऱ्या जलप्रलयातून मी तुला तारीन. मात्र तुला यासाठी थोडी पूर्वतयारी करून ठेवायला हवी. एक मोठी नौका बनव व तीत विविध धान्यांचं बी-बीयाणं भरून ठेव. सतत माझं ध्यान कर. प्रलयकाल आला, की तुझ्या नौकेत बस."

माशाचं म्हणणं ऐकून मनूनं त्याला पाण्याच्या घड्यात ठेवून

दिलं. पण मासा वाढत-वाढत एवढा मोठा झाला, की घड्यातून काढून त्याला तळ्यात नेऊन सोडावं लागलं. तर तो मासा आणखी वाढून तळ्यातही मावेनासा झाला. तेव्हा मनूनं त्याची समुद्रात रवानगी केली.

दरम्यान मनूनं नौका बनवली. अन् तीत विविध धान्यांचं बियाणं जपून ठेवलं. प्रलयकाल येताच मनू त्या नौकेत चढला. आता प्रचंड बनलेला तो मासा त्या नौकेपाशी आला. त्यानं सांगितल्याप्रमाणं मनूनं दोरखंडानं ती नौका त्या माशाच्या शिंगाला बांधून टाकली. मग ती नौका खेचत खेचत माशानं उत्तरगिरीवर नेऊन एका झाडाला बांधून ठेवली. प्रलय ओसरू लागताच ती नौका खाली खाली उतरत जमिनीला टेकली.

जलप्रलय ओसरताच मनूनं यज्ञ केला. मग त्यानं जपून ठेवलेलं बियाणं पेरून विविध धान्य पैदा केलं.

सृष्टीचा विकास घडवून आणण्यासाठी प्रजापतीनं प्रसंग पडला, तसे मत्स्य, कूर्म, वराह असे अवतार धारण केल्याचं 'शतपथ ब्राह्मण' व 'तैत्तिरीय संहिता' या प्राचीन ग्रंथांत नमूद केलेलं आहे. विष्णु-पुराणातही विष्णूनं मत्स्यावतार घेतल्याचा उल्लेख नाही. त्यावरून असं दिसतं, की विष्णुभक्तांनी, हे अवतार विष्णूनं घेतल्याचं मागाहून कधीतरी म्हटलं असावं,

मत्स्यावतारात प्रजापतीनं हयग्रीवासुराला (स्कंदपुराणात या-ऐवजी शंखासुराचा उल्लेख आहे.) ठार मारून, त्यानं चोरून नेलेले वेद परत आणले. तर जलप्रलयाच्यावेळी विश्वबीज तारलं. धान्यबीजां-प्रमाणं सृष्टीतील एकेक जीवही नौकेत ठेवून घ्यायला अवतारी माशानं मनूला सांगितलं होतं, त्यामुळे सृष्टीची निर्मिती झाली.

## ४ चैत्रगौरीची गोष्ट

एकदा स्त्रियांना असुरांचा जाच होऊ लागला. म्हणून त्या महालक्ष्मी गौरीकडं गेल्या आणि तिची त्यांनी करुणा भाकली, की, आम्हाला या जाचातून मुक्त कर. आमच्या नवऱ्यांचं आणि आमचं रक्षण कर. गौरी प्रसन्न झाली आणि तिनं असुरांचं पारिपत्य केलं. गौरीच्या कृपेनं आपल्या सौभाग्याचं रक्षण झालं, म्हणून तिच्याबद्दलच्या कृतज्ञभावानं स्त्रिया तिची पूजा करू लागल्या.

चैत्राच्या तिसऱ्या दिवशी म्हणजेच शुद्ध तृतीयेला महाराष्ट्रातल्या मुख्यतः ब्राह्मण स्त्रिया गौरीला देव्हाऱ्यात बसवून मग महिनाभर, वैशाख शुद्ध तृतीयेपर्यंत तिची पूजा करतात. तसंच या महिन्याच्या एखाद्या मंगळवारी किंवा शुक्रवारी हळदीकुंकवाचा समारंभ करण्याचीही प्रथा आहे. यावेळी गौरीला नटवून-सजवून तिच्यापुढं रांगोळी काढतात. तसंच तिच्यापुढं रंगीबेरंगी बाहुल्या, फळं व खाद्यपदार्थ मांडून तिची आरास करतात. बिनसोललेल्या नारळांना कुंच्या घालतात व बाळं म्हणून ती गौरीपुढं ठेवतात. हळदीकुंकवाला आलेल्यांना आंब्याची डाळ व पन्हं देतात.

रात्री गौरीपुढं फुगड्या-गाणी चालतात.

गौरीची आरती करतात, तेव्हा 'गौरीचं माहेर' नावाचं गाणं म्हणण्याची चाल कोकणात आहे. या महिन्यात गौरी आपल्या माहेरी येते, आपल्या आईकडून सगळं कोडकौतुक करून घेते, मैत्रिणींबरोबर खेळते, झोपाळ्यावर झोके घेते, आणि मग अक्षय तृतीयेला सासरी परत जाते, अशी समजूत आहे.

गौरी ही शिवाच्या परिवारातली देवी असून तिचं पीठ कनोजला आहे.

## ५ गर्वहरण

नारद तिन्ही लोकांत हिंडणारे; स्वर्ग, मृत्यू व पाताळ सगळीकडे त्यांना प्रवेश. सतत वीणा खांद्यावर आणि चिपळचा हातात अशी ती मूर्ती होती. एकदा नारद मृत्युलोकी एका वनात उतरले आणि एके ठिकाणी बसून त्यांनी आपले गायन सुरू केले. हळूहळू वनातील सर्व जनावरे तेथे जमा झाली. ती गाणे ऐकण्यात इतकी तल्लीन झाली की, जन्मापासून हाडवैर असलेली जनावरे शेजारी शेजारी आली. ससा सिंहाच्या मांडीवर निजला. मुंगसाजवळ नाग बसला. माकडे ही चंचल पण वाघाच्यापाशी तीपण मुकाट येऊन बसली.

बराच वेळ गायन झाल्यावर नारद पाहतात तो काय ? हे सर्व दृश्य त्यांच्या दृष्टीस पडले. त्यांना वाटले, या जगात मुक्या प्राण्यांना एका जागी गाण्याच्या जोरावर बसवणे हीच शेवटची पायरी. या तिन्ही लोकांमध्ये मलाच फक्त इतके सुंदर गाता येते.

नारदाला– आपल्या भक्ताला– गर्व झाला आहे हे सर्व जाणणाऱ्या विष्णूंना कळले. ते लगेच मृत्युलोकात जेथे नारद होते तेथे येऊन उतरले व तेथून लगबगीने पुढे जाऊ लागले. नारदांनी हे पाहिल्यावर आपले गायन ऐकावयास प्रत्यक्ष भगवान आले असे वाटून त्यांना फारच अभिमान झाला. मग त्यांना नारद म्हणाले, " भगवान, का बरे आपण खाली यायचे कष्ट घेतलेत ? मी वर आलो असतो."

त्यावर विष्णू म्हणाले, " हे भक्तोत्तमा नारदा ! मी एका संकटात सापडलो आहे. त्यातून तूच मला सोडवण्यास समर्थ आहेस. " हे ऐकून तर नारदांना जास्तच गर्व चढला. मग ते दोघे या वनातून त्या वनात असे जाऊ लागले.

तेथे नारदास असे दृश्य दिसले की एका वीणेचे वरील टोकच त्या दगडातून बाहेर आले होते. ते पाहून नारदांनी श्रीविष्णूंस विचारले, ' भगवान, ही वीणा अशी दगडात कोणी पुरली ?"

विष्णू म्हणाले, " माझा एक परमभक्त गात असता या दगडावर येऊन बसला. तो बसल्यावर या दगडाचे गाणे ऐकता ऐकताच पाणी



झाले. तो दगड विरघळला. त्यामुळे भक्त त्यात बुडून गेला आणि गायन बंद पडून दगड पुन्हा घट्ट झाला आहे. हे त्याच्याच वीणेचे टोक वर राहिलेले दिसते आहे. तरी तू तुझ्या गायनकलेने त्याला वर काढून माझे संकट निरसन कर." नारद एकदम खजील झाला. कारण त्या गायकाने निर्जीव वस्तूलासुद्धा पाझर फोडला होता. आपण तर सजीव प्राण्यांना वैर विसरायला लागले. आपली चूक लक्षात येताच नारदांनी विष्णूचे पाय धरून त्यांची क्षमा मागितली आणि श्रीविष्णूंनीही नारदाचा गर्वपरिहार झालेला पाहून त्याला आशीर्वाद दिला.



## ६ अशोकवृक्षाची कथा

अशोक वृक्षाचं माहात्म्य आपल्याला सांगण्याची विनंती एकदा पार्वतीनं शिवाला केली. तेव्हा शिवानं सांगितलं, " अशोक हा कल्पवृक्ष आहे. मागशील ते तो तुला देईल ! "

शिवाच्या बोलण्याची प्रचीती पाहण्यासाठी पार्वतीनं तत्काल अशोकाकडं एक स्त्री मागितली. तर एक तरुण स्त्री तिच्यापुढं काही क्षणांतच उभी ठाकली. पार्वती प्रथम नवल करीत त्या स्त्रीकडं बघतच राहिली. मग भानावर येताच तिनं त्या तरुणीचा आपली कन्या म्हणून स्वीकार केला. अशोकसुंदरी असं तिचं नाव ठेवून पार्वती तिला वर देत उद्गारली, " नहुष तुला पती म्हणून लाभेल ! "

हिंदूंप्रमाणं बौद्ध धर्माचे अनुयायीही अशोकवृक्ष पवित्र मानतात.

चैत्र शुद्ध ६ या तिथीला षष्ठी देवीची पूजा करतात आणि अशोक वृक्षाच्या सहा कळ्या व मुगाचे सहा दाणे दह्यात मिसळून खातात. या दिवशी बंगाली स्त्रिया अशोकाच्या कळ्या खातात.

चैत्र शुद्ध त्रयोदशीला अशोक वृक्षाची पूजा करण्याबद्दल 'व्रत-राज' या ग्रंथात सांगितलं आहे.

---

## ७ देवी चंदला परमेश्वरी

चंदला परमेश्वरी या देवीचं मंदिर गुलबर्गा जिल्ह्यात असून ते चक्राकार आहे. विशेष म्हणजे मंदिराभोवती दाट अरण्य आहे. देवीची मूर्ती आहे मंदिराच्या तळघरात. तीन फूट उंचीची ही मूर्ती वालुकामय आहे. तुळजापूरच्या भवानीसारखीच या मूर्तीची आकृती दिसते.

या मंदिरात चैत्र वद्य पंचमीला रथोत्सव होतो. शिवाय नव-रात्रोत्सवही होतो.

## ८ विरूपाक्षाची कथा

कर्नाटकातील बेल्लारी जिल्ह्यात हंपी हे पौराणिक तसंच ऐतिहासिक पुण्यक्षेत्र आहे. तिथं असलेल्या पंपा सरोवरातून 'हंपी' हे अपभ्रंश स्वरूपातलं कन्नड नाव या ठिकाणाला पडलं. इथला मुख्य देव विरूपाक्ष हा शिवलिंगरूपी असून तो 'पंपापती' म्हणूनही ओळखला जातो. चैत्रात या देवाच्या मंदिरात दहा दिवस चालणाऱ्या उत्सवाची सांगता चैत्र पौर्णिमेच्या दिवशी रथोत्सवानं होते.

हरिहर व बुक्क यांनी १४ व्या शतकात, हिंदू साम्राज्याचा पाया घालणाऱ्या विजयनगरच्या राज्याची राजधानी हंपी इथं स्थापन केली. या नगराचं नाव प्रथम विद्यानगर असं होतं. विद्यारण्यस्वामी या आपल्या गुरूवरून हरिहरानं विद्यानगर असं या नगराचं नाव ठेवलं होतं. विजयनगर साम्राज्याच्या स्थापनेनंतर हे नगर विजयनगर म्हणून नावारूपाला आलं.

तुंगभद्रा नदीलगत असलेल्या हंपीजवळच रामायणात उल्लेखलेली किष्किंधानगरी आहे. त्याकाळी हा प्रदेश वाली-सुग्रीव या बंधूंच्या राज्यात मोडत होता. त्यावेळी वानरांचे उंच-उंच तट उभारलेले होते.

पं. महादेवशास्त्री जोशी यांनी यासंबंधी लिहिलं आहे—

रावणानं सीतेला पळवून नेल्यावर सीतेचा शोध करीत राम दक्षिण भारतात जात होता. तेव्हा पंपा सरोवरावर हनुमंताशी त्याची भेट झाली. त्या भेटीत परस्परांशी झालेल्या संभाषणानंतर तो बलभीम या पुरुषोत्तमाचा दास झाला. त्यानंच अग्नीच्या तेजस्वी साक्षीनं राम-सुग्रीवाची मैत्री घडवून आणली. पुढं याच सुग्रीवाच्या प्रचंड (अठरा पद्म) वानरदळाच्या साहाय्यानं रामानं समुद्र पार करून रावणाच्या लंकेवर धडक मारली.

आपल्या गुरूचं स्मारक म्हणून हरिहरानं विरूपाक्ष मंदिर उभारलं. पुढं सिंहासनावर बसलेल्या कृष्णदेवरायानं त्या मंदिरासमोर १६५ फूट उंचीचं, ११ मजली गोपुर बांधलं. या मंदिरावर सोन्याचा कळस असून मंदिराजवळच विद्यारण्यस्वामींचा मठ आहे. या मठामार्फतच मंदिराची

सर्व व्यवस्था चालते.

विरूपाक्ष मंदिराच्या परिसरात इतर देव-देवतांची अनेक लहान-मोठी मंदिरं आहेत. त्यांतलं विठ्ठलस्वामीचं मंदिर हे भव्य देवस्थान आहे. याचं प्रांगणच तब्बल ५०० फूट लांब व ३०० फूट रुंद आहे. अर्धमंडपाला तोलून धरणारे बारा फूट उंचीचे छप्पन्न एकसंध स्तंभ आहेत. सर्व खांबांवर सुंदर कोरीव काम केलेलं आढळतं. मंदिराच्या प्रचंड तुळयाही अखंड पाषाणाच्या आहेत. कल्याण मंडपाजवळ २६ फूट उंचीचा, देखणा तसाच कमनीय असा पाषाणाचा रथ आहे. या रथाची चाकं थोड्याशा खटपटीनंतर कुणालाही फिरवता येतात. या रथाची शिल्पकला कमालीची देखणी आहे.

हंपीतच ऋष्यमूक पर्वत असून त्याला लागून तुंगभद्रा नदी धनुष्याकार बनली आहे. नदीच्या काठी काळ्या पाषाणाच्या कोदंडरामाचं मंदिर आहे.

पंपा सरोवरापलीकडं एका मैलावर दुर्गम असा अंजनी पर्वत असून त्यातल्या एका गुहेत अंजनी व हनुमंत या माय-लेकांच्या मूर्ती आहेत.

---

## ९ महाकालीची कथा

एकदा मधु व कैरभ नावाचे दैत्य लोकांना नाना तऱ्हांनी पीडा देऊ लागले. म्हणून हे संकट निवारण्यासाठी लोकांनी महाकालीची करुणा भाकली. तेव्हा चार हातांत विविध संहारक शस्त्रं धारण करून रौद्र स्वरूपात महाकाली प्रकट झाली, आणि तिनं त्या दोन्ही दैत्यांचा संहार केला.

रूप उग्र असलं तरी आपल्या भक्तांचं ती रक्षण करते व त्यांना वरदान देते, अशी तिच्यावर भक्तजनांची श्रद्धा आहे.

चैत्र महिन्यात अनेक ठिकाणी व काही घरांतूनही महाकालीचा उत्सव साजरा करतात. महाकाली म्हणजे आदिशक्ती महामाया हिचं स्वरूप मानलं जातं. आदिशक्तीच्या रौद्र रूपाला महाकाली म्हणतात. दुष्टांचा संहार करणं प्राप्त झालं, म्हणजे ती प्रकट होते अशी भक्तांची धारणा आहे.

## १० शिखर शिंगणापूर

एकदा कैलासावर शिव व पार्वती यांचा सारीपाटाचा खेळ चालला होता. त्यात शिव एकामागून एक डाव हरू लागला. त्यावरून नारदानं त्याला हिणवलं. त्यामुळे चिडून शिव कैलासावरून निघून गेला. तो थेट शिंगणापूरच्या डोंगरात जाऊन गुप्तपणे राहू लागला. पार्वतीनं भिल्लीणीचा वेष घेतला आणि ती शिवाचा शोध घेत रानावनात हिंडू लागली. अखेर चैत्र शुद्ध पंचमीला तिनं शिंगणापूरच्या डोंगरात येऊन त्याला शोधून काढलं. त्यानंतर त्यांनी पुन्हा लग्न केलं.

तर या कथेला अनुसरून लग्नसोहळा करतात. त्यासाठी चैत्र शुद्ध पंचमीला हळदी-समारंभ उरकतात आणि अष्टमीला विवाहसोहळा पार पाडतात. अविवाहित राहण्याचं बंधन असणारे दोघे जंगममाळी रोज देवाला नैवेद्य दाखवण्याची कामगिरी करतात.

शिव-पार्वतीच्या विवाहाचा सोहळा चैत्र शुद्ध अष्टमीला होतो. या विवाहासाठी ५५० फूट लांबीचं भलंमोठं पागोटं विणलं जातं. काही ठराविक कुटुंबांना हे पागोटं विणण्याचा मान मिळालेला आहे. ही कुटुंबं सतत खपून वर्षभरात हे काम पुरं करतात. या पागोटयाचं एक टोक अमृतेश्वराच्या शिखराला तर दुसरं टोक शंभुमहादेवाच्या शिखराला असं बांधलं जातं.

सातारा जिल्ह्यातल्या माण तालुक्यात शिखर शिंगणापूर नावाचं स्वयंभू गणलं गेलेलं शंकराचं स्थान आहे. इथलं शिवमंदिर शंभुमहादेव नावाच्या डोंगरावर आहे. तर शिंगणापूर गाव पायथ्याशी वसलं आहे. शिखरावरचं शिवमंदिर बांधलं व हे गाव वसवलं ते देवगिरीच्या सिंधण यादवानं. इथं एक तलाव आहे, तो शिवाजीमहाराजांचा आजा मालोजीं यानं बांधला.

शिव-पार्वतीची दोन स्वयंभू लिंगं असलेल्या या मंदिरापर्यंत जाण्यास चारशे पायऱ्या चढाव्या लागतात. मंडपाचं वैशिष्टय म्हणजे त्यात पाच दगडी नंदी आहेत. महाशिवरात्रीला इथं मोठी जत्रा भरते:

चैत्र महिन्यात तब्बल दहा दिवस चालणाऱ्या उत्सवात भाविक

लोक बोललेला नवस फेडतात. त्यासाठी ते डोंगराखालून पाण्याच्या कावडी आणून देवाला अभिषेक करतात. सर्वांत मोठी कावड असते भुत्या तेलाची– भल्यामोठ्या दोन रांजणांची. अनेक लोक मिळून ती वाहून वर नेतात.

मराठवाड्यातील भातंगडी गावातून पंचवीसेक हात लांबीची जाडजूड काठी इथं मिरवत आणतात. पुण्याजवळच्या धायरी गावातले माळी लोकही (कोकणातल्या देवाच्या 'तरंगा'सारखी) वरच्या टोकाशी रंगीबेरंगी कापडं गुंडाळलेली भक्कम जाडीची 'काठी' मिरवत इथं आणतात आणि उत्सवानंतर माघारी घेऊन जातात. मूळ गावात 'काठी' पोचल्यावर तिथं जत्रेसारखा उत्सव होतो. त्यासाठी आजूबाजूच्या गावांतलेही शेकडो लोक जमतात.

## ११ मोराच्या पायांची कथा

एकदा एका मोराकडं त्याची भाची मैना गेली. मामाला म्हणाली : "मला एका लग्नसमारंभाला जायचंय्. पण माझे पाय आहेत ओबड-धोबड. तिथं मला सारीजणं हसतील. तेव्हा तुझे सुंदर पाय मला काही काळ उसने दे. समारंभाहून परतले म्हणजे तुझे पाय तुला परत करीन. तोवर माझे पाय तुला घे."

मोर भोळा होता. त्याला वाटलं, थोड्या वेळाचा प्रश्न आहे. भाचीची गरज भागवावी. म्हणून त्याने आपले देखणे पाय मैनेला दिले अन् तिचे स्वत: घेतले. मग ती परत येण्याची तो वाट बघत राहिला. पण मैना कुठली परत येते ? ती त्याला बरेच दिवस तोंडच दाखवीना. अखेर एके दिवशी मोरानं तिला गाठलं. पण त्याचे पाय परत द्यायला तिनं साफ नकार दिला. मोराला या गोष्टीचं दु:ख झालं. म्हणून तो नाचतो, तेव्हा नेहमी खेदानं आसवं गाळतो.

## १२ रामाची गोष्ट

वनवासाची वाट चालता चालता राम, सीता व लक्ष्मण विश्रांतीसाठी एकदा एका गावात, एका म्हातारीच्या घरी गेले. म्हातारीनं त्यांचं आस्थापूर्वक स्वागत केलं. यावेळी रामाकडं एक हंसही होता. जेवणाच्या वेळी हंसाला मोत्यांचा चारा घालण्यासाठी रामानं म्हातारीकडं थोडे मोती मागितले. गरीब बिचाऱ्या म्हातारीकडं काही मोती नव्हते. घरात आलेल्या अतिथीला 'नाही' असं तरी कसं म्हणायचं? गृहस्थी धर्माला ते सोडून होणार होतं. म्हणून ती पाहुण्यांना न सांगता तिकडच्या राजाकडं गेली, अन् तिनं त्याच्याकडं मूठभर मोती उसने मागितले. दिलेले मोती दरिद्री म्हातारीकडून आपल्याला परत मिळण्याची काही आशा नाही, असा विचार राजानं केला आणि त्यानं तिला, वापरून जुने झालेले थोडे मोती देऊन वेळ मारून नेली. म्हातारीनं ते घरी नेले अन् हंसासाठी चारा म्हणून रामाला दिले. दुसऱ्या दिवशी म्हातारीचा निरोप घेऊन जाताना रामानं आपली भेट म्हणून तिच्या अंगणात एक रोप लावलं.

नवल असं की, ते रोप मोठं झाल्यावर त्या झाडाला चक्क मोती लागले, पण म्हातारीला त्याची काही कल्पना नव्हती. तिच्या शेजारणीनं मात्र त्या झाडाखाली पडलेले मोती हेरले अन् ती म्हातारीच्या नकळत ते मोती गुपचूप वेचून पळवू लागली. अचानक एकदा म्हातारीच्या नजरेला ही गोष्ट पडली. तेव्हा मग ती स्वतः ते मोती गोळा करू लागली. मग त्यांतले पाच-सात मुठी मोती फडक्यात बांधून घेऊन तिनं राजाला नेऊन दिले. ते पाणीदार मोती पाहून राजा चकित झाला. त्यानं विचारलं, "तू हे आणलेस कुठून?" तेव्हा म्हातारीनं त्याला दारातल्या झाडाची हकीगत सांगितली. त्यावर राजा बोलला, "तुला म्हातारीला करायचंय काय ते झाड? मी तुला घडाभर सोनंनाणं देतो. तुझी आयुष्याची ददात मिटेल. ते झाड मला देऊन टाक."

म्हातारी साधीभोळी होती. शिवाय प्रत्यक्ष राजाच्या मागणीला नकार कसा देणार? तिनं ते झाड राजाला देऊन टाकलं. राजानं ते

झाड आपल्या अंगणात लावलं, पण तिथं विचित्रच प्रकार घडला. मोत्याऐवजी त्या झाडाला लांब-लांब काटे उगवू लागले. त्यांतला एक काटा एकदा राणीच्या पायात रुतला. त्यामुळं राणी एवढी वैतागली, की तिनं ते झाड परत म्हातारीला देऊन टाकलं.

पण गंमत अशी, की म्हातारीच्या अंगणात पुन्हा आणून रोवल्यावर त्याच झाडाला पुन्हा मोती उगवू लागले. ते गोळा करून त्यांतले काही ती इतरांना वाटू लागली.

▭

## १३ रामदासांची गोष्ट

मराठवाड्यात, गोदावरी नदीच्या काठी, परतुड रेल्वेस्टेशनापासून पंधरा-सोळा मैलांवर जांब हे गाव आहे. याच गावी चैत्र शुद्ध नवमीला रामजन्मोत्सव चालू असताना रामदासस्वामींचा जन्म झाला. नारायण या नावानं त्यावेळी त्यांचं बारसं झालं होतं.

जांब गावाबाहेर हनुमंताचं मंदिर असून त्याच्या परिसरातच रामदासांचे वडील सूर्याजीपंत (ठोसर) यांना रामाचं दर्शन घडलं; तर रामदासांना रामाचा अनुग्रह झाला. रामदासपंथी शंकरराव देव यांनी काही वर्षांपूर्वी इथं रामदासांचं मंदिर बांधलं आहे.

एकदा एका उत्सवप्रसंगी भोजनाची पंगत बसली असताना ऐनवेळी तूप मिळू शकलं नाही. तेव्हा समर्थ रामदासांच्या सांगण्यावरून मातीच्या घागरीनं विहिरीचं पाणी काढून ते तूप म्हणून पंगतीत वाढण्यात आलं, असं सांगतात. आणि ती घागर या मंदिरात असलेली दाखवतात.

दरसाल चैत्र शुद्ध नवमीला इथं मोठा उत्सव साजरा होतो.

लहानपणी लग्नात भटजींनी मंगलाष्टकं म्हणताना 'सावधान' असे इशारेवजा उद्गार काढताच लग्नमंडप सोडून पळून गेलेला नारायण तपश्चर्येनंतर तीर्थयात्रा संपल्यावर तब्बल चोवीस वर्षांनंतर

रामदास बनून आईला भेटायला जांब गावी आला होता.

त्यांची आई राणूबाई त्यावेळी वृद्ध होऊन पार थकली होती. मुलगा नाहीसा झाल्यापासून, त्याची आठवण काढीत रडत रडत तिनं तोवरचे दिवस काढले होते. त्यामुळं तिची दृष्टीही गेली होती. तिच्या जवळ जाऊन 'आई, मी नारायण आलो आहे,' असं रामदासांनी म्हणताच तिनं त्यांना वात्सल्यानं घट्ट मिठी मारली. त्यांनी तिच्या डोळ्यांवरून आपला हात फिरवताच तिची दृष्टी परत आली, असं सांगतात.

मग घरी थोडे दिवस राहून रामदासांनी आईला रामकथा ऐकवली व थोडं फार पुराणकथन केलं. आता आईला त्यांची योग्यता कळून आली. "नारायणा! तू माझा–आपल्या कुळाचा उद्धार केला आहेस. तुझ्या मोहातून मी आता मुक्त झाले आहे. जगाच्या कल्याणासाठी कुठंही संचार करायला तू मोकळा आहेस," असं म्हणून तिनं त्यांना आशीर्वाद दिला.

त्यानंतर आईचा निरोप घेऊन आपल्या पुढील कार्यासाठी रामदासांनी जांबगाव पुन्हा सोडलं.

## १४ बुधाष्टमीची कथा

कृत युगात इल नावाचा राजा एकदा शिकारीला गेला होता. हिंडता-हिंडता तो हिमालयाच्या एका शापित टापूत नकळत गेला. 'या टापूत जो पुरुष शिरेल त्याचं रूपांतर स्त्रीमधे होईल' असा शंकराचा शाप होता. अर्थात या टापूत शिरताच तो स्त्री बनला. तो दिवस अष्टमीचा होता. योगायोगानं त्यावेळी बुध तिथं आला. त्या स्त्रीचं लावण्य पाहून बुध तिच्यावर मोहित झाला. तिच्याशी त्यानं लग्न केलं. त्या स्त्रीपासून पुरूरवा या सोम वंशाच्या मूळ पुरुषाचा जन्म झाला.

या घटनेपासून बुधाष्टमी व्रत प्रचलित झालं.

हे व्रत केल्यानं बुद्धिमत्ता लाभते, असं याचं फळ सांगितलं आहे.

## १५ गोला गोकर्णनाथाची कथा

तीन शिंगं असलेल्या मृगाचं रूप घेऊन शंकर एकदा इथं हिंडत फिरत होता. शंकर कैलासावर नाही, असं पाहून ब्रह्मा व विष्णू त्याचा शोध घ्यायला लागले. शोध घेता–घेता इथं त्यांना हा मृग दिसला. पाहताक्षणीच तो मृगरूपी शंकर आहे, हे त्यांनी हेरलं. त्यांनी त्याची शिंगंच घट्ट पकडून धरली. हे पाहून शंकर तत्काळ हरणाच्या रूपासह अंतर्धान पावला. पण हरणाच्या रूपातली त्याची तीन शिंगं मात्र ब्रह्मा-विष्णूंच्या हाती बाकी राहिली. तर त्यांतलं एक शिंग इथल्या इथं स्थापन करण्यात आलं. उरलेल्या दोहोंपैकी एक भागलपूर जिल्ह्यातल्या शृंगेश्वरी इथं, व दुसरं प्रत्यक्ष स्वर्गलोकी स्थापण्यात आलं.

उत्तर गोकर्णक्षेत्र म्हटलं जाणारं गोला गोकर्णनाथ हे पुण्यक्षेत्र असून ते ईशान्य रेल्वेमार्गावर, लखीमपूरनजीक आहे. चैत्राच्या पहिल्या पंधरवड्यात इथं मोठी यात्रा भरते.

इथलं गोकर्णनाथ महादेवाचं मंदिर एका विशाल सरोवरालगत उभारलेलं आहे.

## १६ गोंडांची कथा

कंकालकाली म्हणून एक मुलगी होती. ती एका ऋषीबरोबर त्याची बायको बनून राहिली. तिला एकूण बावीस मुलं झाली. पण ती सारी मुलं तिनं वनात सोडून दिली. नंदीवर बसून जगाची पाहणी करीत असलेल्या शंकर-पार्वतींनी त्या मुलांचं रडणं ऐकलं. त्यांची दया येऊन पार्वतीनं त्या मुलांना आपल्या घरी नेलं. त्यांचं पालनपोषण केलं. ती मुलं मात्र उपकार विसरून शंकराशी कृतघ्नपणानं वागली. त्यामुळं चिडून त्यानं त्या सर्वांना एका पडक्या विहिरीत कोंडून ठेवलं. काही वर्षांनंतर पहाडिक पारलिंगो या मुनीला ही गोष्ट कळली. तेव्हा

त्यानं शंकराला विनंती करून त्यांची सुटका करून घेतली. चार-पाच, सहा व सात अशा गटागटांनी आता मोठी बनलेली ती मुलं विहिरी-बाहेर पडली.

ही माणसं म्हणजेच गोंडांचे मूळ पुरुष. गटागटांनी ही माणसं वेगवेगळ्या स्थळी जाऊन राहिली. काही काळानं त्यांचा वंश वाढला व त्यांची अनेक घराणी बनली.

नागपूर भागातले गोंड चैत्र महिन्यात मातादेवीची जत्रा भरवतात. देवीचं प्रतीक म्हणून दगड बसवतात. आणि देवीच्या स्वरूपात तिला पिवळं वस्त्र, सूत आणि फण्या-बांगड्या अर्पण करतात. भीमसेन हा मातादेवीचा भाऊ मानलेला असतो. त्याला नारळ अर्पण करून बकरा बळी देतात.

## १७ महावीराची कथा

महावीर हा जैनांचा २४ वा तीर्थंकर असून तो पाटण्याजवळच्या कुंडग्रामी चैत्र शुद्ध त्रयोदशीला जन्मला. त्याचा काळ इसवी सनापूर्वीच्या सहाव्या शतकातला मानतात.

महावीराचं मूळ नाव वर्धमान होतं. पण त्याची विशेष वीरवृत्ती पाहून संगमदेवानं त्याला ' महावीर ' असं नाव ठेवलं.

एकदा वर्धमान एका वटवृक्षावर चढून बसला होता. तर त्याला घाबरवण्यासाठी संगमदेवानं सर्पाचं रूप घेऊन त्या झाडालाच त्यानं विळखा घातला. पण वर्धमान त्याला घाबरला नाही; तसाच त्याला मारायलाही प्रवृत्त झाला नाही. उलट त्यानं आपल्या आत्मिक सामर्थ्यानं सापामधील हिंसक प्रवृत्ती नाहीशी करून टाकली. तेव्हा संगमदेवानं प्रसन्न होऊन त्याला महावीर असं नाव दिलं.

महावीर लहानपणापासूनच विशेष ज्ञानी असल्याचं आढळून आलं. तो थोडा मोठा झाल्यावर ज्ञानी म्हणून त्याची कीर्ती पसरली. ती ऐकून एक मुनी त्याला भेटायला आले. तर महावीराच्या केवळ



दर्शनानं त्या मुनींच्या मनातल्या शास्त्राविषयीच्या शंकांचं निरसन झालं.

पुढं वयाच्या तिसाव्या वर्षी महावीर घर सोडून गेला व त्यानं तप आरंभलं. बारा वर्षं तपसाधना करून त्यानं केवल ज्ञान प्राप्त करून घेतलं.

मग त्यानं सर्वत्र फिरून लोकांना सदाचारानं वागण्याचा वगैरे धर्मोपदेश केला. गृहस्थलोकांनी पुढील आठ मुलभूत गुण पाळावेत असा उपदेश तो करी–

१) मांस खाऊ नका, २) दारू पिऊ नका, ३) मध खाऊ नका. (कारण मधाच्या पोळयांतून मध मिळवताना मधमाश्यांची असंख्य अंडी नष्ट केली जातात.), ४) प्राण्यांना पीडा देऊ नका, ५) असत्य बोलू नका, ६) चोरी करू नका, ७) आपल्या बायकोखेरीज इतर स्त्रियांना आई–बहीण–मुलगी माना, ८) संसारासाठी जरूर तेवढंच द्रव्य साठवा. जास्त धनाची इच्छा बाळगू नका.

त्यावेळच्या समाजजीवनातल्या अनिष्ट प्रवृत्तींविरुद्ध बंड पुकारून महावीरानं श्रमणसंस्था स्थापली. जातिव्यवस्थेवर हल्ला केला. अर्ध-मागधी या लोकभाषेत त्यानं आपली तत्त्वं सोप्या रीतीनं प्रतिपादली. त्यामुळं ती लोकांना नीट समजली.

## १८ हनुमानाची गोष्ट

रामाचा खरा सेवक हनुमान. लहानपणापासून याला पराक्रमा-चीच आवड; आणि सेवेचीही.


आपल्या भारतात दक्षिणेला ऋष्यमूक नावाचा पर्वत आहे. तेथे रामाच्या वेळेला अंजना नावाची एक वानर स्त्री होती. ती मारुतीची आई. आणि त्याच्या वडिलाचे नाव होते केसरी. तिने वायुदेवाची प्रार्थना केली. खूप तप केल्यावर वायुदेव प्रसन्न झाला. आणि अंजनाच्या मना-सारखा तिला बलवान पुत्र झाला. मरुत म्हणजे वारा; त्याच्या कृपेने झाला म्हणून त्याला मारुती म्हणू लागले. पण मारुतीला हनुमान नाव कसे पडले तीही एक गमतीदार गोष्ट आहे बरे का.

अंजनेचा हा मुलगा उपजल्याबरोबर लागला उड्या मारायला. सकाळची वेळ होती. नुकता कुठे सूर्य वर येत होता. याला वाटले, चांगले दिसतेय पिकलेले लाल लाल फळ ! घ्यावे झाले हातात ! आणि टाकावे मटकावून !

झाले, मनात यायचा अवकाश– मारली उडी आकाशात. पण सूर्यावर उडी मारलेली पाहताच राहू आला धावून. लगेच केतूही पण आला. झाली झटापटीला सुरुवात. अंजनेच्या पोराने दिला शेपटीचा तडाखा ठेवून. त्याबरोबर ते गेले दोघे तीन ताड उडत !

ही बातमी कळली इंद्राला: सूर्याला गट्टम् करायला हे कोण बाळ निघालेय: म्हणून तोच पहायला आला: त्याने हाक मारली तर एक नाही की दोन नाही. मारुती आपला चाललाय पुढेच.

तसा आला इंद्राला राग. त्याच्या हातात होते वज्र. त्याचे ते भयंकर शस्त्र. इंद्राने तेच भिरकावले अंजनेच्या या बाळावर. ते लागले



त्याच्या हनुवटीला. हनु म्हणजे हनुवटी. ती दुखावली नि सुजून चांगली मोठी दिसायला लागली. म्हणून पडले त्याचे नाव हनुमान !

पण वायुदेवाचा आवडता होता हा हनुमान. इंद्रदेवाने, देवाच्या राजाने आपल्या लाडक्या मानलेल्या मुलाला जखमी करून पाडले असे कळल्याबरोबर वायुदेवाने सगळ्यांची हवाच बंद करून टाकली.

शेवटी साऱ्यांचे प्राणच कोंडले. देव, माणसे, इतर प्राणी, वनस्पती सारे कासावीस झाले. सारेजण घाबरले. तेव्हा मग सर्व देवांना घेऊन इंद्र वायूकडे आला. त्याची क्षमा मागितली. वायुदेवाला प्रसन्न करण्यासाठी त्याने हनुमानाला वर दिला. इंद्र त्याला म्हणाला, "मी तुझ्यावर वज्र टाकले तरी तू त्याचा तडाखा सहन केलास, जिवंत राहिलास. तुझी शक्ती फारच दांडगी आहे म्हणून मी तुला वर देतो की, तुझ्या मनात असेल तितके दिवस तुला जगता येईल."

## १९ चंद्रपूरची महाकाली

विदर्भात चंद्रपूर इथं महाकालीचं मंदिर आहे. ही देवता गोंडवनाची आराध्य देवता. हिच्यासंबंधी अशी कथा सांगतात—

कृतयुगात कृतध्वज राजानं लोकपूर म्हणून नगर वसवलं होतं. त्याचंच नाव पुढं चंद्रपूर असं पडलं. मागाहून कृतध्वजाचा पुत्र सुनंद राज्यावर बसला, तेव्हा एके रात्री या ठिकाणी महाकाली प्रकट झाली. तिला भूतनाथ नावाचा पुत्र होता. तो देवस्त्रियांना भुलवू लागला. म्हणून चिडून तिनं त्याचा शिरच्छेद केला. आणि त्याचं मस्तक एका ठिकाणी पुरून तिनं तिथं गाईच्या खुरासारखी मोहोर बसवली. हे स्थळ पुढं अचलेश्वर म्हणून ओळखलं जाऊ लागलं.

द्वापार युगात चंद्रहास राजा कौतलपूर इथून राज्य करीत होता. एकदा हिंडत असताना तो अचलेश्वराच्या टापूत आला. तर ते ठिकाण त्याला आवडून तिथं त्यानं आपली नवी राजधानी वसवली. चंद्रहासाच्या नावावरून मग तिला चंद्रपूर नाव पडलं.

पुढं १२ व्या शतकानंतर या भागात गोंडांचं राज्य सुरू झालं. गोंड राजा वीरशहा याच्या कन्येचं लग्न देवगडचा राजा दुर्गपाल याच्याशी झालं होतं. दुर्गपालानं एकदा तिचा अपमान केला. ती बाणेदार स्त्री असल्यानं तडक माहेरी आली. आणि बापाला तिनं देवगडावर स्वारी करायला लावली. लढाईत दुर्गपाल ठार झाला. तेव्हा वीरशहानं त्याचं शिर महाकालीला अर्पण केलं. मग वीरशहाची राणी हिराई हिनं महाकालीचं भव्य मंदिर बांधून त्यावर एक दगडी शिर बसवलं. तेव्हापासून तिथं चैत्र पौर्णिमेस देवीचा मोठा उत्सव करण्यात येऊ लागला.



## २० लोकदेव जोतिबा

जोतिबा हा महाराष्ट्रातला लोकदेव असून, त्याचं मुख्य स्थान आहे कोल्हापूरजवळच्या जोतिबाच्या डोंगरावर. या डोंगराला रत्नागिरी असंही म्हणतात. देवाच्या गुरवांची वस्ती मंदिराजवळ आहे, तिला म्हणतात वाडी-रत्नागिरी. जोतिबा हा खरं म्हणजे केदारनाथ.

एकदा कोल्हापूर भागात दैत्यांनी धुमाकूळ घातला होता. तेव्हा लोकांनी कोल्हापूरच्या महालक्ष्मीला साकडं घातलं. म्हणून महालक्ष्मी दैत्यांचा संहार करायला सज्ज झाली. त्यावेळी तिला मदत करायला कैलासाहून केदारनाथ धावून आला. दैत्यांचं पारिपत्य केल्यावर हा जोतिर्लिंग म्हणून रत्नागिरीवर राहिला. या ज्योतिर्लिंगाचंच ज्योतिबा–जोतिबा हे लौकिक नाव रूढ झालं.

खड्ग, डमरू, त्रिशूळ अशा आयुधांसह घोड्यावर बसून केदारनाथ दैत्यसंहारासाठी आला होता, अशी समजूत. म्हणून त्या स्वरूपात त्याची चार हातांची मूर्ती स्थापन केलेली आहे.

इथलं केदारलिंगाचं मंदिर मुळात नावजी साया या शिवभक्तानं बांधलं म्हणतात. पण सध्या अस्तित्वात असलेल्या मंदिराला आकार-रूप दिलंय ते राणोजी शिंदे यानं १७३० साली.

चैत्री पौर्णिमेला इथं प्रचंड यात्रा भरते. तिला दूरवरून लाखो लोक जमतात. त्यावेळी देवावर गुलाल-खोबऱ्याची उधळण होऊन 'जोतिबाचा चांगभले' ही घोषणा डोंगरभर दुमदुमते.

महाराष्ट्रातल्या कैक घराण्यांनी जुन्या काळापासून या जोतिबाला आपलं कुलदैवत मानलेलं आहे. ग्वाल्हेरच्या शिंदे राजघराण्यानं तर आपल्या या कुलदैवताच्या उपासनेचे वैभव खूप वाढवले.

## २१ चित्रपौर्णिमा

एकदा इंद्र गैर वागला म्हणून बृहस्पतीने त्याची कानउघडणी केली. तेव्हा इंद्रानं अपमान केला म्हणून बृहस्पती इंद्रलोक सोडून गेला. आता हटकणारा दुसरा कोणी नसल्याने इंद्राची स्वारी बिनधास्तपणे वागू लागली. अनाचार करू लागली. थोड्या दिवसांनी राग ओसरल्यावर बृहस्पती पुन्हा इंद्रलोकात आला. पाहतो, तर इंद्र पापाचरणात गुरफटलेला. बृहस्पतीला फार वाईट वाटलं. त्यानं इंद्राला उपदेशाचे चार शब्द सांगून त्याचे डोळे उघडले. इंद्र खजिल झाला. हातून घडलेलं पाप निवारायचा मार्ग त्याने बृहस्पतीला विचारला. तेव्हा बृहस्पतीने त्याला तीर्थयात्रा करायला सांगितले. मग इंद्र तीर्थाटनाला निघाला. पण बरीच तीर्थं करूनही त्याला पापक्षालन झाल्याचं समाधान लाभेना. अखेर एका ठिकाणी जाऊन पोचताच पापांतून आपण मुक्त झाल्याचा साक्षात्कार त्याला झाला. याचं कारण शोधताना त्याला एक शिवलिंग दिसलं. त्या शिवलिंगाची केवळ जवळीक साधल्यानं आपली पापं दूर झाली हे जाणून त्यानं त्या शिवलिंगाची पूजा केली. त्या दिवशी चैत्र पौर्णिमा होती. म्हणून तेव्हापासून या दिवशी लोक पापनिवारणासाठी शिवपूजा करायला लागले. त्यानिमित्त उत्सवही साजरा करू लागले.

चित्रा नदी कुट्टालम पर्वतावर उगम पावली, ती याच दिवशी, अशी समजूत आहे. म्हणून या नदीत या दिवशी स्नान केल्यानं पुण्य लाभतं, असं मानून लोक तीत स्नान करतात.



## २२ डॉ. भीमराव आंबेडकर



अस्पृश्य समाजाचे थोर नेते डॉ. भीमराव आंबेडकर हे १८९१ साली १४ एप्रिल रोजी महू इथं जन्मले. वडील रामजी सकपाळ, तर आई भीमाबाई. रामजी जातीनं महार. लष्करातील महार पथकात काही वर्षं घालवल्यावर ते लष्करी छावणीतल्या शाळेचे मुख्याध्यापक झाले. पुढं ते सुभेदार-मेजर बनले.

लहानपणी सातारा इथं शिकत असताना भीमाच्या शाळेत आंबेडकर आडनावाचे एक ब्राह्मण शिक्षक होते. भीमावर त्यांचा लोभ जडला होता. भीम त्यावेळी आंबावडेकर असं आडनाव लावायचा. ते त्यांना पसंत नव्हतं. " यापुढं तू आंबेडकर असं आडनाव लावीत जा. " असं ते त्याला म्हणाले. एवढंच नव्हे, तर त्याचं तसं आडनाव त्यांनी शाळेच्या दप्तरात नोंदूनही टाकलं.

पुढं बी. ए. ची पदवी घेतल्यावर बडोद्याचे संस्थानिक सयाजीराव गायकवाड यांचं साहाय्य मिळवून ते अमेरिकेतील कोलंबिया विद्यापीठात गेले. तिथं त्यांनी एम. ए., पीएच. डी. पदवी संपादन केली, भारतात परतल्यावर त्यांनी बडोदे संस्थानात नोकरी पत्करली, पण

लौकरच इंग्लंडला जाऊन त्यांनी बॅरिस्टर ही पदवी पटकावली. या शिक्षणासाठी कोल्हापूरचे शाहूमहाराज यांनी त्यांना द्रव्यसाहाय्य केलं होतं.

उच्च विद्या संपादन केली, तरी अस्पृश्य जातीचे म्हणून आयुष्यात खूप अपमानास्पद वागणूक त्यांच्या वाटयाला आली. म्हणून त्यांनी अस्पृश्यांवर होणारे अन्याय दूर करण्याचं व त्यांचा उद्धार करण्याचं व्रत घेतलं. त्यासाठी त्यांनी 'मूकनायक', 'बहिष्कृत भारत', 'जनता'. 'समता' व 'प्रबुद्ध भारत' या नावांची वृत्तपत्रं काढली. यांतून ते अस्पृश्यांवरील अन्यायांना पोटतिडकीनं वाचा फोडीत राहिले. अस्पृश्य समाजाचं संघटन करून त्यांनी महाडच्या चवदार तळयावर पाणी भरण्याचा पहिला मोठा सत्याग्रह (१९२७ सालच्या मार्चमध्ये) केला. त्यानंतर १९३० सालच्या मार्चमधे नासिकच्या राममंदिरात प्रवेश करण्याचा दुसरा सत्याग्रह केला. याच साली ते गोलमेज परिषदेचे सभासद झाले. या परिषदेत असताना, अस्पृश्यांना वेगळा मतदारसंघ मिळावा, असा आग्रह त्यांनी धरला व ती मागणी मंजूर करून घेतली. पण हा निर्णय रद्द व्हावा म्हणून म. गांधींनी पुण्यात प्राणांतिक उपोषण सुरू केलं. तेव्हा म. गांधींशी डॉ. आंबेडकरांची चर्चा झाली. शेवटी 'पुणे करार' उभयतांत होऊन हे प्रकरण मिटलं.

डॉ. आंबेडकरांनी १९३६ साली स्वतंत्र मजूरपक्ष स्थापला. पुढं १९४२ साली ते व्हॉइसरॉयच्या कार्यकारी मंडळात मजूरमंत्री बनले. या पदावर असतानाच्या पाच वर्षांच्या काळात अस्पृश्य समाजाची उन्नती घडवून आणण्यासाठी त्यांनी झटून खटपट केली. अस्पृश्यांना उच्च शिक्षणाच्या खास सोयीसवलती उपलब्ध करून देण्यासाठी मुंबईत सिद्धार्थ महाविद्यालय स्थापन केलं. 'शेडयूल कास्ट फेडरेशन' या अस्पृश्यांच्या वेगळया पक्षाचं त्यांनी दीर्घकाल नेतृत्व केलं.

भारत स्वतंत्र झाल्यावर कायदेमंत्री म्हणून केंद्रीय मंत्रिमंडळात त्यांची नेमणूक झाली. स्वतंत्र भारताची नवीन राज्यघटना तयार करण्यात सिंहाचा वाटा त्यांचा होता. महत्त्वाचं हिंदू कोडबिल लोकसभेत त्यांनीच (१९४८ साली) सादर केलं.

रमाबाई ही पहिली पत्नी १९३५ साली वारल्यावर पुढं १९४८ साली त्यांनी डॉ. लक्ष्मीबाई कबीर यांच्याशी दुसरं लग्न केलं.

हिंदू धर्मात अस्पृश्यांवर अन्याय होतो, म्हणून त्यांनी धर्मांतर करण्याचं ठरवलं आणि १९५६ साली दसऱ्याच्या मुहूर्तावर नागपुरात त्यांनी, जातिभेद नसलेल्या बौद्धधर्माचा स्वीकार केला. यावेळी त्यांच्या ५ लाख अनुयायांनी त्यांचं अनुकरण केलं, पण त्यानंतर ते फार काळ जगले नाहीत. त्याच वर्षीच्या डिसेंबरात (दि. ६ ला) दिल्ली इथं ते निधन पावले.

इतिहास, समाजशास्त्र, अर्थशास्त्र, राजकारण अशा नाना विषयांवर त्यांनी बरेच विद्वत्तापूर्ण ग्रंथ लिहिले आहेत.

---

## २३ वसंतऋतू

चैत्र व वैशाख हे दोन महिने मिळून वसंत ऋतू गणला जातो. वर्षातल्या एकूण सहा ऋतूंतला हा ऋतू सर्वोत्तम मानला जातो. ‘ऋतूंमधे मी वसंत आहे’ असे गौरवपर उद्‌गार भगवद्‌गीतेत काढून श्रीकृष्णानं या ऋतूला श्रेष्ठत्व दिलेलं आहे.

या ऋतूत फुला-फळांना बहर येतो. हा ऋतू सुरू होताच सगळीकडं आल्हाददायक वातावरण पसरतं, असं ऋग्वेदातल्या काही मंत्रातही म्हटलेलं आहे. आदिकवी वाल्मीकी याने रामायणात वसंत ऋतूचं वर्णन अप्रतिम केलेलं आहे. या ऋतूचं वर्णन करण्यात संस्कृत कवींची अहमहमिका लागलेली दिसून येते. महाकवी कालिदासानंतर वसंताच्या प्रभावामुळे वनश्रीचं रंगरूप कसकसं बदलतं याचं बारकाईनं वर्णन ‘रघुवंशा’सारख्या महाकाव्यात केलेलं आहे.

या ऋतूत तरुण मंडळींच्या वृत्ती मोहरून येतात व ते वेगवेगळ्या क्रीडांमधे दंग होतात. तसाच सामान्य जनांचाही उत्साह वाढतो आणि नाना उत्सव साजरे करून ते आपला आनंद व्यक्त करतात.

## २४ घंटाकर्णाची कथा

घंटाकर्ण हा मूळ शिवाचा गण; पण शापामुळं तो मनुष्याच्या जन्माला आला. याच्याबद्दलची कथा आहे, ती अशी–

मोठेपणी पंडित बनलेल्या घंटाकर्णाला विक्रमराजाच्या दरबारातील पंडितांना जिंकायची आकांक्षा निर्माण झाली. हा हेतू साध्य व्हावा म्हणून त्यानं शिवाची उपासना केली. काही काळानं शिव प्रसन्न झाला आणि म्हणाला : "कालिदासाखेरीज बाकीच्या साऱ्याजणांना तू जिंकू शकशील !" या अर्धवट वरामुळं घंटाकर्ण शिवावर रूसला. एवढा, की शिवाचं नावसुद्धा न घेण्याचा निर्धार त्यानं केला.

मग शिवाच्या वराला न जुमानता त्यानं प्रत्यक्ष कालिदासालाच वादाचं आव्हान दिलं. शिवावरचा त्याचा राग लक्षात घेऊन कालिदासानं त्याला "शिवाचं एक स्तोत्र रचशील, तर माझा पराभव मी मान्य करीन." असं सांगितलं. त्यावर घंटाकर्णानं तसं एक स्तोत्र रचलं, पण त्यात शिवाच्या नावाचा उल्लेख मात्र टाळला. तरीसुद्धा कालिदासानं आपला पराभव कबूल केला. आपल्यावरील स्तोत्रानं प्रसन्न होऊन शिव घंटाकर्णावर प्रसन्न झाला व त्यानं त्याला आपल्या परिवारात स्थान दिलं.

'हरिवंश' या ग्रंथात मात्र घंटाकर्णाची वेगळी कथा दिली आहे, ती अशी–

हा शिवाचा एवढा कडवा भक्त होता, की तो विष्णूचा द्वेष करायचा. एवढा की, विष्णूचं नाव आपल्या कानांवर पडू नये यासाठी त्यानं आपल्या कानांवर चक्क घंटा अडकवून ठेवली होती.

यामुळं लोक त्याला घंटाकर्ण म्हणायला लागले.

बंगालमधे घंटाकर्ण हा देव मानण्यात येत असून रोगराई होऊ नये म्हणून हा देव पूजतात.

## २५ ढिंपुरी तीर्थाची कथा

चंबळ नदीच्या तीरावर ढिंपुरी नावाचं जैनतीर्थ आहे. एका चैत्यालयात महावीर व पार्श्वनाथ यांच्या मूर्ती आहेत. भोवताली मात्र दाट अरण्य आहे. या तीर्थाबद्दल सांगितलं जातं ते असं—

पूर्वीच्या काळी विमलयशा नावाच्या राजाला पुष्पचूल म्हणून पुत्र होता. तो खोडया करून लोकांना भंडावून सोडी. म्हणून लोक त्याला वंकचूल म्हणायचे. याचा त्रास असह्य झाल्यानं लोकांनी राजाकडं तक्रारी केल्या. म्हणून चिडून राजानं त्याला राज्यातून हद्दपार केलं.

वंकचूलचं लग्न झालेलं होतं. अर्थात त्याला आपल्या बायकोसह वनवास पत्करावा लागला. भटकता भटकता एके ठिकाणी त्याला भिल्ल वस्ती लागली. तिथं त्या भिल्लांच्या नायकानं त्याला आसरा दिला. तसा तो हुशार होताच. त्यामुळं लौकरच तो भिल्लांचा नायक बनला. वाटमारी करण्यात प्रवीण बनला.

एकदा काय झालं— धर्म व धर्मदत्त हे दोन मुनी चैत्राच्या सुमारास त्या भिल्लवस्तीत येऊन राहिले. पुढं पावसाळाभर त्यांनी तिथंच तप करीत मुक्काम केला. त्या मुनींचं आचरण, त्यांचं तप व ज्ञान पाहून वंकचूल भारला गेला. आपला मुक्काम आटोपून ते मुनी निघून जाऊ लागले, तेव्हा वंकचूल त्यांना विनवीत म्हणाला : "मला काहीतरी उपदेश करा." वाटमारी सोडून ईश्वराची उपासना करण्याचा उपदेश करून मुनी त्याला म्हणाले : "या तुमच्या वस्तीत चैत्यालय बांधा आणि त्यात भगवान महावीर आणि पार्श्वनाथ यांच्या मूर्ती स्थापा."

वंकचुलानं त्याप्रमाणं करून ईश्वराची उपासना सुरू केली.

त्यानंतर या स्थानाची महती आसपास पसरत गेली. दर्शनासाठी लांबलांबचे लोक येऊ लागले आणि या स्थानाला तीर्थस्थानाचं स्वरूप आलं.



म. ग्रं. सं. ठाणें, वाचनालय शाखा.
बा. क्र. 7653 दि. 28।5।
विषय कथा

## २६ जनकपूर

जनकपूर हे तीर्थक्षेत्र प्राचीन काळी मिथिला, विदेह अशा नावांनी ओळखलं जाई. सध्या हे स्थान नेपाळ देशात आहे.

महाभारताच्या कालानंतर या ठिकाणी निबिड अरण्य माजलं. तेव्हा अनेक ऋषी-मुनी इथं तप करू लागले. त्यांच्यातला सूरकिशोर नावाचा ऋषी जानकीची उपासना वात्सल्यभावानं करायचा. एकदा सीतेनं त्याला दृष्टांत दिला– 'जिथं माझी मूर्ती तुला सापडेल, ते माझं निवासस्थान समज.' तर शोध घेता घेता सूरकिशोराला सध्याच्या स्थानी सीतेची सोन्याची मूर्ती सापडली. त्याच जागेवर लहानसं मंदिर उभारून त्यात ती मूर्ती त्यानं स्थापन केली.

पुढच्या काळात बुंदेलखंडाच्या राणीनं इथं उत्कृष्ट असं जानकी मंदिर उभारलं. या मंदिराचं शिल्पकाम अप्रतिम असून या मंदिरालगतच राम, लक्ष्मण, हनुमान व जनक यांची मंदिरं आहेत. रामानं जनक राजाकडच्या शिवधनुष्याचा भंग केला तो इथंच, असं सांगतात.

इथं रामनवमीला मोठा उत्सव साजरा होतो.

## २७ कामधेनूची गोष्ट

जमदग्नी ऋषीचे नाव ऐकले असेलच तुम्ही. तापट माणूस म्हणजे जणू दुर्वासाचा किंवा जमदग्नीचा अवतार आहे, असे म्हणतो आपण पुष्कळदा. या जमदग्नी ऋषींच्या आश्रमात कामधेनू ही गाय होती.

कामधेनू ही गाय कुठली ? समुद्र-मंथनाच्या वेळी जी चौदा रत्ने समुद्रातून बाहेर आली त्यांतच ही गाय होती. आपण जी वस्तू मागू (तिची कामना करू) ती ती तात्काळ देत असे. म्हणून तिला म्हणायचे कामधेनू. ती घेतली होती देवांच्या राजाने– इंद्राने. नंतर जमदग्नींनी तपश्चर्या करून इंद्राला प्रसन्न करून घेतले; आणि इंद्राने

'वर मागा' म्हटले तेव्हा ही कामधेनूच त्यांनी मागितली. तेव्हापासून ती त्यांच्याच आश्रमात होती.

जमदग्नी ऋषी या गाईची मनापासून सेवा करायचे. त्यांची पत्नी रेणुकासुद्धा तिचा गोठा झाडून स्वच्छ करायची. तिला पाणी वगैरे पाजायची. परशुराम या दोघांचा मुलगाच. त्याला तर या गाई-बद्दल खूपच आदर होता. पण तो दुसरीकडे पर्वतावर तपश्चर्या करीत होता. त्यामुळे सगळा वेळ गाईची सेवा करणे काही त्याला जमायचे नाही.

जमदग्नींचा स्वभाव फार परोपकारी होता. कोणा गरीब माण-साला काही हवे असले की ते कामधेनूकडून मिळवून द्यायचे. कुणाला संपत्ती दे, कुणाला भरजरी वस्त्रे दे असा दानधर्म सारखा चालूच असायचा त्यांचा. ह्याशिवाय कोणाला निरनिराळी पक्वान्ने हवी असा-यची. तीसुद्धा कामधेनू द्यायची.

त्या वेळी तिथे कार्तवीर्य नावाचा राजा राज्य करीत होता. त्याला हजार हात असल्याने सगळे लोक सहस्रार्जुन म्हणायचे त्याला. हा राजा एकदा शिकारीला आश्रमाजवळच्या प्रदेशात आला. बरोबर त्याचे सैन्य होतेच. फिरून-भटकून सगळे सैन्य गेले थकून. चांगल्या कडकडीत भुका लागल्या त्यांना. पण खाणार काय? स्वयंपाकाची सामग्री घ्यायचीच विसरले होते सगळे. मग कुणीतरी जमदग्नीचे नाव सुचविले. कामधेनूकडे आपली चांगली सोय होईल असे म्हणाले.

आणि झालेही तसेच. जमदग्नींनी त्यांची उत्तम व्यवस्था ठेवली. काही कुठे कमी पडू दिले नाही त्यांना. जेवणात तर इतके विविध प्रकार होते की सगळे सैन्य खूष झाले. कार्तवीर्य राजासुद्धा जेवून तृप्त झाला. त्याला वाटले, ही कामधेनू हवी बुवा आपल्याजवळ. नाहीतरी या भिकारड्या ऋषीकडे आबाळच होतेय तिची.

कार्तवीर्याने याबाबत जमदग्नींना विचारले. पण छे! इतक्या श्रमाने मिळवलेली कामधेनू ते कसची जाऊ देतात? त्यांनी स्पष्ट नकार दिला. पण राजाचा निश्चय पक्का ठरला होता. तो सैनिकांना म्हणाला, "चला रे घेऊन या गाईला आपल्याबरोबर."

जमदग्नी ऋषी स्वस्थ बसले. एवढ्या सैन्यापुढे त्यांचे काय चालणार होते ? पण परशुरामाची गोष्ट निराळी. तपश्चर्येहून काही दिवसांनी तो परत आला. कामधेनू त्याला आश्रमात कोठेच दिसेना. मग त्याने वडिलांना विचारले. त्यांच्याकडून त्याला सगळी हकीकत समजल्यावर त्याचा संताप अनावर झाला. ज्या राजाने गोब्राह्मणांचे पालनपोषण व रक्षण करायचे तो जर असा जुलूम करायला लागला तर मग कसे होणार ? ही जबरदस्ती म्हणजे गाईचा अपमान वाटला त्याला. तो तडक कार्तवीर्याचा समाचार घ्यायला निघाला. आपल्या तीक्ष्ण परशूने त्याने कार्तवीर्याचे सगळे हातच तोडून टाकले. कामधेनू सोडवून आणली त्याने तेव्हा कुठे त्याच्या मनाचे समाधान झाले.

परशुराम हा विष्णूंचा सहावा अवतार. गायीचे पावित्र्य व मोठेपण त्यालाही पटलेले होते.

## २८ पराक्रमी गरुड

कश्यपऋषीला दोन बायका होत्या. एकीचे नाव विनता आणि दुसरीचे नाव कद्रू. दोघी सख्ख्या बहिणी होत्या. एक दिवशी सकाळी दोघीही सूर्याला नमस्कार करताना सूर्याच्या रथाच्या पांढऱ्या घोड्याकडे पाहून दोघींनी त्याचे कौतुक केले. विनताने म्हटले, "किती पांढरा शुभ्र घोडा हा ! त्यावर कोणताही डाग नाही."

कद्रू नेहमीच तिला विरोध करीत असे. तिने सांगितले घोड्याची शेपटी काळी होती. विनताला तिचे म्हणणे पटले नाही. विनता म्हणाली, "घोड्याची शेपटी पांढरीच होती." दोघींचा वाद चालू झाला नेहमीप्रमाणे. कद्रूने ही गोष्ट पैजेवर आणली. घोड्याची शेपटी काळी असेल तर विनतेने कद्रूची दासी व्हावे आणि पांढरी असेल तर कद्रूने विनतेची दासी व्हावे असे ठरले.

घोड्याची शेपटी पांढरीच होती हे कद्रूला माहीत होते. आपण दासी होणार याचे तिला भय वाटू लागले. तिने आपल्या सर्व मुलांना

बोलावले. कद्रूची मुलं म्हणजे सर्व सर्पच. कद्रूने सर्पांना सांगितले, "मी आता दासी होणार." मुलांना खूपच वाईट वाटले. त्यांनी कपट करावयाचे ठरविले. ते पांढऱ्या घोड्याच्या शेपटीला जाऊन चिकटले. दुसऱ्या दिवशी सूर्योदयावेळी कद्रूने विनतेला घोड्याची शेपटी काळी असल्याचे दाखविले. विनता दासी झाली. सर्व सर्प आणि कद्रू विनतेचा आणि तिचा मुलगा गरुड याचाही छळ करू लागले. गरुडाला ते सहन झाले नाही. दास्यत्वातून मुक्त होण्यासाठी मी काय करावे ? तुम्हाला काय द्यावे ? असे कद्रूला आणि सर्पांना गरुडाने विचारले.

त्या भयंकर दुष्ट सर्पांना अमर व्हायचे होते. अमर होण्यासाठी त्यांना स्वर्गातले अमृत हवे होते. सर्पांनी गरुडाला अमृत आणून देण्यास सांगितले. अमृत आणून दिल्यावरच त्याची व त्याच्या आईची दास्यातून सुटका होईल असे सर्पांनी सांगितले.

अमृत आणण्यासाठी गरुड स्वर्गाकडे निघाला. पराक्रमी गरुड अमृत नेण्यासाठी स्वर्गाकडे येत असल्याचे इंद्राला समजले. अमृताभोवती कडेकोट पहारा बसविला. सैन्य वाढविले. गरुडाने इंद्राचे अफाट सैन्य पाहिले. त्याला एक युक्ती सुचली. आपल्या प्रचंड पंखांनी वादळ घडविले. खूप धूळ उडविली. त्यामुळे इंद्राच्या सैन्याला काहीच दिसेनासे झाले. याचा फायदा घेऊन ताबडतोब गरुडाने अमृतकलश उचलला. अमृतकलश घेऊन जात असताना विष्णूने त्याला अडविले. त्यावेळी इंद्रही तेथे आला. गरुडाने त्यांना सारी हकीगत सांगितली आणि दास्यातून मुक्त होण्यासाठी सर्पांना अमृत देत असल्याबद्दल सांगितले. इंद्राने कद्रूचा खोटेपणा गरुडाला पटवून दिला. घोड्याच्या शेपटीला सर्प चिकटल्यामुळे शेपटी काळी दिसल्याने विनता ही दासी बनली होती. कद्रूचा खोटेपणा गरुडाच्या लक्षात आल्यावर त्याला खूप राग आला. इंद्राने त्याला एक युक्ती सांगितली. त्याप्रमाणे गरुडाने तो अमृतकलश घरी आल्यावर दर्भाचे आसन करून त्यावर तो कलश ठेवला.

अमृतकलश पाहून सर्वच साप आनंदाने डोलू लागले. त्याबरोबर

गरुडाने सांगितले, " तुम्हाला अतमृकलश मी आणून दिलेला आहे. मी व माझी आई आता दास्यातून मुक्त झालो ना !" असा प्रश्नही त्यांना विचारला. "हो! हो!! तुम्ही दोघेही मुक्त आहात !" सापांनी एकच गिल्ला केला, आणि अमृत पिण्यासाठी कलशाकडे जाऊ लागले. गरुड मध्येच त्यांना अडवीत म्हणाला, " बंधूंनो, अमृत पिण्यापूर्वी अंघोळ करून यावे. मगच पवित्र अमृत प्राशन करावे." सर्व सापांना त्याचे म्हणणे पटले. सर्व साप अंघोळीला निघून गेल्यावर दर्भावर ठेवलेला अमृतकलश इंद्राने पळविला.

अंघोळ करून आल्यावर सर्पांना अमृतकलश दर्भावर नसल्याचे दिसून आले. तरीही आधाशी सर्पांनी दर्भावर अमृत सांडले असे समजून दर्भ चाटण्यास सुरुवात केली. त्यामुळे दर्भाच्या धारेमुळे सापांच्या जिभांचे दोन भाग झाले. आजतागायत सापांना दोन जिभा आहेत.

गरुडाचा पराक्रम पाहून विष्णूही प्रसन्न झाले. गरुडाला अमृताशिवाय अमर केले. गरुडदेखील विष्णूच्या सेवेत राहण्यासाठी वाहन म्हणून विष्णूकडेच राहिला.

## २९ वज्रेश्वरीची गोष्ट

सिंहमार व कलिकाल हे दोघे असुर बंधू मोठे पराक्रमी होते. आपल्या ताकदीच्या घमेंडीत ते सगळीकडे धुमाकूळ घालायला लागले. ऋषीमुनींच्या यज्ञात ते विघ्न आणू लागले. त्यांच्या या छळापासून वाचवण्यासाठी देवांची करूणा भाकण्याकरिता वसिष्ठ ऋषींच्या नेतृत्वाखाली ऋषींनी यज्ञ आरंभला. यज्ञात इतर देवांना हविर्भाग दिला गेला. पण इंद्राला द्यायचा राहून गेला. त्यामुळं इंद्र कोपला व त्यानं आपलं वज्र वसिष्ठ ऋषीवर फेकलं. पण त्याच वेळी जगन्माता पार्वती अचानक प्रकट झाली व तिनं ते वज्र मधल्यामधे गिळून टाकलं. त्यावरून तिला वज्रेश्वरी हे नाव पडलं.

वज्रेश्वरी गावात गंधकाची, कमी-अधिक उष्ण झऱ्यांची अनेक कुंडं आहेत. या झऱ्यांचं पाणी आरोग्यदायक मानलं जातं. म्हणून या झऱ्यांजवळच या पाण्याच्या उपचारासाठी एक आरोग्यकेंद्र सुरू करण्यात आलं आहे.

ठाणे जिल्ह्यातील भिवंडी तालुक्यात, उल्हास नदीच्या तीरावर एका टेकडीवर वज्रेश्वरी देवीचं देऊळ आहे. चैत्रातल्या नवरात्रात इथं यात्रा भरते.

## ३० चैत्राचा महिमा

भारतीय वर्षगणनेतील बारा मासांतला, वर्षारंभाचा पहिला मास. या महिन्याच्या पौर्णिमेच्या सुमारास चित्रा नक्षत्र असतं. त्यावरून याला 'चैत्र' असं नाव पडलं. याला 'मधुमास' असेही म्हणतात. वर्षातील सहा ऋतूंपैकी पहिला ऋतू वसंत याच महिन्यापासून सुरू होतो. नवं संवत्सर सुरू करणाऱ्या चैत्र शुद्ध प्रतिपदा या पहिल्या दिवसाला 'पाडवा' म्हणतात. या दिवशी सकाळीच, अनशापोटी कडुलिंबाच्या पाल्याचा थोडाफार रस प्राशन करण्याची जुनी प्रथा आहे. याच दिवशी चंडिकेच्या नवरात्राला सुरुवात होते. चैत्र शुद्ध नवमीला 'रामनवमी' म्हणून रामजन्माचा उत्सव साजरा केला जातो. जुनी परंपरा पाळणारे लोक चैत्र महिन्यात रोज सकाळी आपल्या घराच्या अंगणाचा एक चौकोन सारवतात. व त्याच्यावर ठराविक प्रकारची रांगोळी काढतात. तिला म्हणतात चैत्रांगण. या चैत्रांगणावर हळदकुंकू व फुलं वाहतात. तसंच या महिन्यात तुळशीवृंदावनावर मातीची बुडकुली टांगून 'गळती' लावण्याची जुनी प्रथा आहे.

## ३१ अभिलाषेचे फळ

रघू स्वभावानेच गरीब होता. तो गावकऱ्यांना अडीअडचणीच्या वेळी मदत करी, म्हणून सर्व त्याचे गुण गात. गावकऱ्यांना मदत करीत असूनही रघूने चार पैसे मागे टाकले आणि लग्न करून संसार थाटला. त्याने एक लहानसे घरसुद्धा विकत घेतले.

एकदा एकाएकी रघूच्या घरात चोर शिरले आणि त्याच्या घरात जी थोडी चीजवस्तू आणि पैसाअडका होता तो चोरून नेला. गावकऱ्यांनी चंदा करून नुकसानभरपाई केली.

त्याच गावात भिकूशेट नावाचे एक व्यापारी राहात असत. त्याने काळा बाजार करून खूप पैसे मिळविले होते. परंतु रघूला गावकऱ्यांनी सहजी जमा करून दिलेले पैसे पाहून तो हेवा करू लागला. एके दिवशी रात्री त्याने आपल्या घरातले सर्व सोने आणि पैसे नेऊन गावाबाहेर एका तलावात ठेवले. उजाडल्यावर छाती बडवून रडू लागला की चोरांनी त्याला लुबाडले. त्याच्या घरच्या चोरीची बातमी 'हां हां' म्हणता गावभर पसरली. प्रत्येकाने सहानुभूती दर्शविली. परतु कोणी त्याच्या मदतीला धावला नाही कारण त्याने आपल्या आयुष्यभरात कधी कोणाला मदत केली नव्हती.

म्हणून भिकूशेट नवराबायकोने अमावस्येच्या दिवशी रात्री पुरून ठेवलेले धन घेऊन गाव सोडून दूरच्या कोणत्यातरी गावी निघून जायचे ठरविले. तिकडे गावच्या पाटलाने मनात गावात एक मोठे देऊळ बांधायचे ठरविले आणि पाया खणायला सुरवात केली. पाया खणत असता भिकूशेटने पुरून ठेवलेले धन निघाले. लोक म्हणू लागले, देवानेच स्वत.चे देऊळ बांधायला पैशाची तजवीज करून ठेवली होती. परंतु भिकूशेटला त्याच्या लबाडीबद्दल चांगलीच शिक्षा भोगायला लागली.

## ३२ अंगठा पर्वताची कहाणी

बऱ्याच वर्षांपूर्वीची गोष्ट. मॉरिशसमध्ये सोनू नि मालू नावाचे दोन व्यापारी होते. जहाजातून त्यांचा परदेशांशी एकत्र व्यापार चालायचा.

एकदा हे दोघे काही माल जहाजातून भरून परदेशाला निघाले. काही महिने त्यांचा प्रवास सुरळीत चालला. पण एके दिवशी रात्री अचानक भयानक तुफान उठलं. सोसाट्याच्या जोरदार वादळी वाऱ्यामुळं प्रचंड लाटा उसळू लागल्या आणि लाटांच्या त्या तांडवात सोनू नि मालू यांचं जहाज सापडलं अन् पार बुडालं. जहाजावरचे सारे खलाशीही दुर्दैवानं समुद्रात बुडाले. पण नशीब बलवत्तर होतं म्हणून की काय, सोनू नि मालू हे जोडीदार त्या तुफानातून वाचले. फळकुटांच्या तराफ्याच्या आधारानं ते रात्रभर लाटांशी झगडत तरंगत राहिले.

सकाळी-सकाळी वादळ ओसरलं; पण तरीसुद्धा आपण भर समुद्रात एकाकी पडलो असल्याचं त्यांना दिसून आलं. चहूंकडं अफाट समुद्र पसरलेला. किनाऱ्याची कुठंच पुसटसुद्धा नावनिशाणी दिसत नव्हती.

रात्रभरच्या श्रमानं देह कमालीचा थकून गेला होता. भुकेनंतहानेनं जीव व्याकूळही झाला होता. बेशुद्ध पडतात की काय, अशी त्यांची अवस्था झाली. तेवढ्यात त्यांनी मनोमन जलदेवतेचं स्मरण केलं आणि आपले जीव वाचविण्याची करुणा भाकली. त्यांचं सुदैव असं की, काही क्षणांतच जलदेवता त्यांच्या पुढ्यात उभी ठाकली. तिनं त्यांना विचारलं—

" कोणतं संकट आलंय् तुमच्यावर ?"

सोनू-मालूंनी कसंबसं सांगितलं: "परदेशाला जहाजातून माल घेऊन चाललो होतो. तर आमचं जहाज तुफानात सापडून बुडालं. जहाजावरचे खलाशी नि माल यांना तर आम्ही मुकलोच. अन् आम्ही या तराफ्याला धरून आतापर्यंत कसेबसे जिवंत राहिलोत. वादळात लाटांशी झटापट करून जीव अगदी व्याकूळ झालाय. किनारा तर कुठं

दिसत नाही. कुठल्या तरी किनाऱ्यावर आम्हाला सुखरूप पोचवून देण्याची कृपा कर."

त्यांची दया येऊन जलदेवतेनं त्यांना आशीर्वाद देत म्हटलं, " चिंता करू नका. तुमची सुखरूप सुटका करते."

मग आपल्याकडची एक अंगठी, एक दुपट्टा अन् माथ्यावरचा एक केस काढून तो त्यांना देत ती म्हणाली–

" या दुपट्टयावरून तुम्हाला कुठंही जाता येईल. तर ही अंगठी तुमच्या मनात येईल ती वस्तू तुम्हाला देऊ शकेल. अन् हा माझा केस या समुद्राच्या दिशेला धरून माझं स्मरण तुम्ही कराल, तेव्हा मी स्वत: तात्काळ प्रकट होईल अन् तुमच्यावर आलेली आपत्ती दूर करीन. मात्र या वस्तूंचा योग्य तोच उपयोग करा. गैरउपयोग करू नका."

एवढं बोलून जलदेवता समुद्रात अदृश्य झाली. सोनू-मालूंनी तराफ्यावर दुपट्टा पसरला. अन् त्यावर ते बसले. ' आम्हाला किनाऱ्यावर पोचवून दे.' अशी सूचना त्यांनी केली. तर तो दुपट्टा त्यांच्यासह हवेत उडाला अन् तरंगत पूर्वेच्या दिशेनं आभाळातून वेगानं उडत राहिला.

थोड्या वेळानं त्यांना दूरवर किनारा दिसू लागला, तेव्हा त्यांच्या मनाला उभारी आली. नंतर पाहता-पाहता दुपट्टयासह ते समुद्र-किनाऱ्यावर सुखरूप उतरले.

जमिनीवर पाय टेकताच दोघांनाही अतोनात आनंद झाला. थोडा वेळ विश्रांती घेऊन त्यांनी आधी शीण घालवला.

तहानभूक तर सपाटून लागली होती. जवळपास कुणीतरी भेटेल अन् आपल्याला अन्नपाणी देईल, या अपेक्षेनं ते हिंडू लागले. पण खूप भटकूनही कुणा माणसाचा ठावठिकाणा लागला नाही. आता काय करावं ? तहानभुकेनं मरण्याची पाळी येते की काय ?– अशी चिंता त्यांना पडली. जवळच त्यांना एक नदी आढळली. तिचं पाणी पिऊन त्यांनी तहान भागवली अन् अन्नाविना हताश होऊन ते एके ठिकाणी बसून राहिले.

तेवढ्यात त्यांना जलदेवतेनं दिलेल्या अंगठीची आठवण झाली.

ती अंगठी अन्नपाण्याची आपली इच्छा पुरी करील की ! ... ही आठवण होताच ती अंगठी सोनूनं पुढचात धरली अन् जेवण मिळावं अशी इच्छा व्यक्त केली.

तर काही क्षणांतच पक्वान्नांनी भरलेली दोन ताटं त्यांच्या पुढचात प्रकट झाली. पोटभर जेवून ते पुन्हा नदीवर गेले अन् तिथं त्यांनी पाणी पिऊन हात नि तोंड धुऊन घेतलं. अंगठी सोनूनं आपल्या हाताच्या बोटात घातली होती. नदीच्या पाण्यात हात धुताना ती अंगठी सैल झाल्यानं त्याच्या नकळत नदीत पडली. पण भूक भागल्याच्या समाधानात अंगठी पडल्याचं त्याच्या लक्षातही आलं नाही. नदीकाठावरच्या एका झाडाच्या सावलीत ते खुशाल आराम करीत बसले. आधीच थकलेभागले असल्यानं त्यांना बसल्या जागी गाढ झोप लागली.

झोपेतून जागे झाल्यावर त्यांना जलदेवतेनं दिलेल्या दुपट्ट्याची आठवण झाली. त्या जादूच्या दुपट्ट्यावरून एखाद्या नगरीत जावं असं त्यांनी योजलं पण पाहतात तर दुपट्टा बरोबर नाही, असं त्यांना आढळून आलं: समुद्रकिनाऱ्यावर प्रथम पाय लागल्याच्या आनंदात, उतरल्या जागीच तो दुपट्टा ते विसरले होते. पुन्हा पायपीट करून त्यांनी ते ठिकाण गाठलं. पण तिथं दुपट्टा नव्हता. जवळपास खूप शोध घेतला. पण दुपट्टा कुठं सापडला नाही तो नाहीच. आपल्या हातातली अंगठीही हरवल्याचं सोनूच्या लक्षात आलं. म्हणजे त्या निर्जन ठिकाणी भुकेनं तडफडत मरण्याची आपत्ती आपल्यावर आता ओढवणार अशी भीती त्यांना वाटू लागली. आता काय करायचं ? दोघेही हताश होऊन गेले.

तेवढ्यात जलदेवतेनं दिलेल्या केसाची आठवण त्यांना झाली. तो मात्र मालूनं आपल्या बंडीच्या खिशात जपून ठेवला होता. तो काढून समुद्राच्या दिशेला धरला नि त्यानं जलदेवतेचं स्मरण केलं. तेव्हा काही क्षणांतच जलदेवता त्यांच्या समोर प्रकट झाली. तिनं विचारलं—
" आता आणखी कोणतं संकट आलं तुमच्यावर ?"

सोनू बोलला: " गफलतीनं आम्ही तुमचा दुपट्टा अन् अंगठी दोन्ही हरवून बसलो. आता आम्ही इथं— या निर्जन जागी अडकून पडलो आहोत. आमच्या देशाला— आमच्या घरी आता आम्ही कसे

पोहचणार ? म्हणून तुम्हाला पुन्हा यायची तसदी द्यावी लागली. देवी, कृपा करा अन् आमची इथून सुटका करा."

जलदेवता म्हणाली– "एकदा तुम्हाला मदत करायची ती मी केली. आता माझ्या हातून या भूमीवरचं काही होण्यासारखं नाही. पण मला तुमची दया येते; म्हणून दुसरा उपाय सांगते. पलीकडल्या त्या डोंगरावर जा. तिथं वनदेवी आहे. अगदी माथ्यावर गेल्यावर तिचं स्मरण करा; म्हणजे ती तुम्हाला दर्शन देईल. तिला माझा हा केस दाखवा. मग ती तुम्हाला हवी ती मदत करील."

–एवढं बोलून जलदेवता समुद्रात अदृश्य झाली. सोनू नि मालू आता डोंगराच्या दिशेने चालू लागले. डोंगरावर चढत-चढत त्यांनी अखेर डोंगराचा माथा गाठला. मग त्यांनी वनदेवतेचं स्मरण केलं तशी एक रूपसुंदर देवी त्यांच्या समोर प्रकट झाली. मालूनं जलदेवतेचा केस तिला दाखवला आणि मदतीची याचना केली.

वनदेवी म्हणाली– "मी तुम्हाला अवश्य मदत करीन. मात्र तुम्ही दोघांनी फक्त एकेकच वर मागायचा: तेवढा मी पुरा करीन."

हे ऐकून सोनू नि मालू खूष झाले. सोनूला आपल्या घरची ओढ लागली होती. कधी एकदा आपल्या बायको-मुलांना भेटतो असं त्याला झालं होतं. म्हणून तो लगेच वनदेवतेला म्हणाला–

"मला माझ्या घरी सत्वर पोहचता येईल असं करा !" वनदेवी हसून सोनूला म्हणाली– "ठीक आहे ! तुझी इच्छा मी लगेच पुरी करते. समुद्राच्या दिशेनं तोंड करून डोळे मिटून उभा राहा, आणि आपल्या घरचं स्मरण कर."

सोनूनं समुद्राच्या दिशेला तोंड केलं अन् डोळे मिटून घराचं स्मरण करीत तो स्वस्थ उभा राहिला. तेव्हा वनदेवीनं त्याच्या पाठीवर हलकेच चापटी मारली. त्याबरोबर सोनू समुद्रावरून हवेत उडत-उडत गेला– पार दिसेनासा झाला. तो अलौकिक चमत्कार पाहून मालू थक्क झाला. भान हरपून तो त्या लावण्यवती वनदेवीकडं टकमक बघतच राहिला. तिच्या अपूर्व लावण्यानं तो एवढा दिपून गेला, की आपल्याच घराची, बायको-मुलांची आठवणही तो विसरून बसला. त्या वनदेवीशी

लग्न करण्याचा एकच ध्यास त्याला लागला. तिच्यापाशी तोच वर मागायचं त्यानं ठरवलं.

तेवढ्यात त्याच्याकडं पाहात वनदेवीनं म्हटलं– "हां ! मालू, आता तू माग पाहू तुला हवा तो वर."

मालूला आपली इच्छा व्यक्त करायला प्रथम संकोच वाटू लागला. तरीपण धीर एकवटून तो पुटपुटला–

"मला तुझ्याशी लग्न करायचंय्. आयुष्यभर तुझ्याबरोबर राहयची इच्छा आहे माझी !"

मालूची ती विचित्र इच्छा ऐकून वनदेवी थक्क झाली. बोलून चालून वनदेवी ती ! मनुष्याशी ती कशी लग्न करणार ? तशी इच्छा एका माणसानं व्यक्त करणं हा शुद्ध उद्धटपणा होता. ती चिडली. घुश्शातच ती मालूला बोलली–

"हा भलताच आडमुठा वर मागण्याचा उद्धटपणा तुझ्यानं करवला तरी कसा ? तरीसुद्धा एकवार मी तुला क्षमा करतेय्. आता नीट विचार कर अन् दुसरा कोणता तरी वर माग."

मालूला वाटलं– आपण पुन्हा तोच वर मागितला, तर तिच्याशी लग्न करायची आपली खरोखरीच इच्छा आहे, हे तिला पटेल. म्हणून मालूनं धीर करून पुन्हा म्हटलं– "तुझ्याशी लग्न करून आयुष्यभर तुझ्याबरोबर राहण्याची माझी इच्छा आहे. ती पुरी कर."

आता मात्र वनदेवी क्रोधानं भडकून उठली. त्याला म्हणाली– "तुला दुसरा कोणता तरी वर मागायला बजावलं होतं. पण तू तोच भलता आडमुठा वर पुन्हा मागितलास. तरीसुद्धा क्षमा करून तुला शेवटची संधी देतेय्. नीट विचार कर नि दुसरा कोणता तरी वर माग. या वेळी तू कसूर केलीस, तर तुझं भलं होणार नाही !"

या खेपेला मालू काहीच बोलला नाही. पण आपली पहिलीच मागणी कायम आहे, हे वनदेवीच्या नजरेस आणण्यासाठी त्यानं तिला आपला उजवा अंगठा दाखवला.

वनदेवीला त्याच्या या खुणेचा नीटसा बोध झाला नाही; पण तो दुराग्रहानं आपल्या पहिल्याच मागणीला चिकटून राहिलाय याची,

त्याच्या चेहऱ्यावरून तिला कल्पना आली. तिचा संताप अनावर झाला आणि गर्जून तिनं त्याला आदेश दिला–

"जंगलाच्या दिशेला तोंड करून उभा राहा; आणि डोळे मिटून वनस्थलाचं स्मरण कर !"

अतिशहाणा मालू जंगलाकडं तोंड करून, डोळे मिटून स्वस्थ उभा राहिला.

वनदेवीनं बारीकशी काटकी घेऊन ती मालूच्या माथ्यावर मारली. त्याबरोबर मालूच्या पायाखालची जमीन दुभंगली अन् तो जमिनीच्या पोटात शिरत राहिला. हां-हां म्हणता त्याचं कंबरेपर्यंतचं शरीर जमिनीत गाडलं गेलं.

डोळे मिटून राहिलेल्या मालूला अजूनही भास होत होता, की आपण स्वर्गात जात आहोत. कंबर जमिनीत खचू लागली, तेव्हा मालूनं आपला उजवा हात उंच धरला. पण शेवटी डोक्यापर्यंतचं शरीर जमिनीत गडप झाल्यावर त्याचा उभारलेला उजवा हातही खचत गेला. अखेरीस त्या हाताचा केवळ अंगठा बाकी उरला, तेव्हा वनदेवीनं मघाच्याच काठीनं त्याच्या त्या अंगठ्याला स्पर्श केला. त्यासरशी तो अंगठा पाषाणाचा बनला. अन् मालूच्या शरीराचा तेवढाच अवशेष जमिनीच्या वर अटकून राहिला. तेव्हा वनदेवी उद्गारली–

"साऱ्या दुनियेला तुझा अंगठा दाखवून आपला मतलब लोकांना समजावून सांग !"

एवढं बोलून वनदेवी अदृश्य झाली.

मालूचा तो अंगठा आजही 'अंगठा पर्वत' या नावानं प्रसिद्ध आहे.

(मॉरिशसच्या लोककथेवरून)



## ३३ चित्रांग

एका गावात चित्रांग नावाचा कुत्रा होता. तेथे एकदा खूप काळ दुष्काळ पडला. अन्न नसल्याने कुत्र्यांचे कुळच नष्ट होण्याच्या मार्गाला लागले. चित्रांग भुकेने व्याकुळ झाला: आणि मरणाच्या भयाने दुसऱ्या देशात गेला. तेथें एका नगरातील एका घरी मालकिणीचं लक्ष नाही असे पाहून तो आत शिरत असे आणि अनेक प्रकारचे अन्न खाऊन तृप्त होऊन बाहेर पडत असे, पण बाहेर आल्यावर तेथील माजलेले उद्धट कुत्रे त्याला सर्व दिशांनी वेढून त्याला अंगभर चावत असत.

तेव्हा त्याने विचार केला, ‘ दुष्काळ असला तरी आपला स्वदेश उत्तम. तेथे सुखाने राहता येते आणि रोज लढाई करायला कोणी येत नाही. तेव्हा मी परत आपल्या गावी जाईन.’ असा विचार करून तो आपल्या गावाकडे परत आला.

तो परदेशाहून परत आलेला पाहून त्याच्या भाऊबंदांनी विचारले, “ अरे चित्रांग, आम्हाला परदेशाचा वृत्तांत सांग ना. तो देश कसा आहे ? तेथील लोक कसे वागतात ? त्यांचा आहार कोणता असतो ? कोणते व्यवहार तेथे चालतात ?”

तो म्हणाला, “ परदेशाचे काय वर्णन करू ? तेथे खायला नाना प्रकारचे पदार्थ आहेत आणि नगरातील स्त्रियाही सैल व ढिल्या आहेत, पण एकच दोष आहे. आपल्या जातभाईंचाच तेथे फार त्रास आहे.”



BVBK-0401753
BVBK-0401753
म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय